# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

## राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा निम्नस्तर परीक्षा

## प्रश्नपत्रिका दोन—सुसंगत लेखन व अनुवाद

रविवार, दिनांक ९ जुलै २०२३

**[वेळ :** दुपारी २-१५ ते सायंकाळी ५-००]

**(तोंडी परीक्षेस लागणार वेळ धरून)**

**(एकूण गुण — १००)**

---

**सूचना :—**

(१) **नवीन प्रश्न** नवीन पानावर सोडवावा.

(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.

(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा **पूर्ण गुण** दिले जाणार नाहीत.

गुण

प्रश्न क्र. १. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे १५ ते २० ओळींत तुमचे विचार मांडा :— २०

(अ) मुलगी झाली हो ! स्वागत करू या मुलीच्या जन्माचे !

(ब) विज्ञानयुगातील अंधश्रद्धा.

प्रश्न क्र. २. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर चर्चा करा :— २०

(अ) 'राष्ट्रीय एकात्मता' या विषयावर चर्चा करा.

(ब) 'वृक्ष संवर्धन काळाची गरज ' या विषयावर चर्चा करा.

प्रश्न क्र. ३. खालीलपैकी कोणत्याही **दोन** बाबी तयार करा :— ३०

(अ) 'रस्ता सुरक्षा सप्ताह' सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये राबविणेबाबत शासकीय निर्णयाचे परिपत्रक तयार करा.

(ब) माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकांना 'तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण' देण्याबाबत मान्यता प्रस्ताव शिक्षण संचालक यांच्याकडे सादर करा.

(क) 'निशिगंधा महिला संघटनेतर्फे आज रक्तदान शिबिर संपन्न' याबाबत प्रसिद्धीपत्रक तयार करा.

प्रश्न क्र. ४. खालीलपैकी प्रत्येक गटातून कोणत्याही **पाच** संज्ञांचे मराठी पर्याय द्या :— १५

**'अ'** गट

(अ) Criticism — (ब) File

(क) Geology — (ड) Incentive

(इ) Jubilee — (फ) Domain.

**'ब'** गट

(अ) Meteorology — (ब) Rest House

(क) Noteworthy — (ड) Runway

(इ) Pedestrian — (फ) Yard.

[उलटून पहा

गुण

'क' गट

| | |
|---|---|
| (अ) Validity | (ब) Self defence |
| (क) Writ | (ड) Thesis |
| (इ) Senate | (फ) World Record. |

प्रश्न क्र. ५. खालीलपैकी कोणत्याही **पाच** वाक्यांचे मराठीत भाषांतर करा :— १५

(अ) Mangoes contain vitamins

(ब) Flowers bring grace to the house

(क) It is easy to say but it's difficult to do

(ड) You kept me waiting for long time

(इ) I am sure that he will get success

(फ) He always reneges from his own word.

---

# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

## राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा निम्नस्तर परीक्षा

## प्रश्नपत्रिका एक–विहित पाठ्यपुस्तक व कार्यरूप व्याकरण

रविवार, दिनांक ९ जुलै २०२३

**[वेळ : सकाळी १०-३० ते दुपारी १-००]**

**(एकूण गुण – १००)**

---

**सूचना :–**

(१) **नवीन प्रश्न** नवीन पानावर सोडवावा.

(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.

(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा **पूर्ण गुण** दिले जाणार नाहीत.

गुण

प्रश्न क्र. १. पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा :— २०

अनेकांच्या समजुती प्रमाणे बर्फ पडू लागण्यापूर्वी हे पक्षी बेडूक, खवलेकरी अथवा काही सस्तन प्राण्यांप्रमाणे चिखलात अथवा कडेकपारीत गाडून घेऊन प्रदीर्घ हिवाळी झोप काढत असले पाहिजेत. पुढे माणूस एका खंडातून दुसऱ्या खंडात प्रवास करू लागला तेव्हा त्याच्या लक्षात आले, की आपल्या खंडातून गायब होणारे पक्षी त्याच ऋतूत दुसऱ्या खंडात दिसून येतात.

पक्ष्यांच्या स्थलांतराचा अभ्यास करणे, ही काही सोपी गोष्ट नाही ; पण अवघडातल्या अवघड प्रश्नातून विज्ञानाला मार्ग काढावेच लागतात. पक्ष्यांच्या स्थलांतराचे मार्ग शोधण्यासाठी एक साधा व कष्टसाध्य उपाय गेल्या शतकापासून वापरला जात आहे. एखाद्या विशिष्ट भागात अनेक पक्षी पकडून त्यांच्या पायात खुणेचे वाळे अडकवून द्यायचे. ॲल्युमिनियमचे बनवलेले हे वाळे हलके असतात, त्याचे पक्ष्यांना ओझे होत नाही. या वाळ्यावर ज्या संशोधन संस्थेने ते लावले त्या संस्थेचे नाव आणि खुणेचा क्रमांक असतो. कोणत्या क्रमांकाचे वाळे कोणत्या पक्ष्याला, कुठे आणि केव्हा लावले यांची संस्थेकडे नोंद असते.

वाळे अडकवलेले हे पक्षी पुन्हा मोकळे सोडले जातात. एखादा वाळे असलेला पक्षी जिवंत अथवा मृत ज्याला सापडेल त्याने त्या संस्थेला कळवावे अशी अपेक्षा असते. अर्थात लावलेल्या सर्व वाळ्यांची माहिती परत मिळतेच असे नाही; परंतु शंभरातल्या एक दोन वाळ्यांचा जरी पत्ता लागला तरी त्यातून मौल्यवान माहिती मिळू शकते. केरळात वाळे लावलेले परीट पक्षी काबूल, अफगाणिस्तान, वायव्य पाकिस्तान या भागांत सापडले आहेत. केरळातलाच एक रानपरीट (forest wagtail) ब्रह्मदेशात सापडला आहे. जर्मनीत वाळे लावलेला बलाक बिकानेरमध्ये सापडला आहे.

अलीकडच्या काळात विमाने आणि रडारयंत्रणामुळे सुद्धा पक्ष्यांच्या स्थलांतराविषयी मोलाची माहिती मिळाली आहे. तरीसुद्धा पक्ष्यांच्या या गूढ सवयीं संबंधीची कित्येक रहस्ये अद्याप उकललेली नाहीत.

पक्ष्यांच्या स्थलांतराचे अनेक प्रकार पाडता येतील. हिमालयासारख्या पर्वत रांगामध्ये राहणारे पक्षी थंडीत खाली दरीत अथवा सखल भागात उतरतात आणि उन्हाळ्यात परत वर सरकतात. त्यांचा एकूण प्रवास काही किलोमीटरचाच असतो. अनेकदा दुष्काळ, महापूर अथवा बर्फवृष्टीमुळे

[उलटून पहा

एखाद्या प्रांतात अन्न मिळेनासे झाले, की पक्षी तो प्रांत सोडून तात्पुरते दुसरीकडे जातात. मुळात अन्नाचा दुर्भिक्ष हीच स्थलांतराची मूळ प्रेरणा आहे. पक्ष्यांना थंडी वाऱ्याची फारशी काळजी नसते. अन्नाचा पुरेसा पुरवठा असेल, तर पक्षी बर्फाळ प्रांतातही व्यवस्थित जगू शकतात. एरवी दोन ते पाच हजार मीटर उंचीपर्यंत सापडणारे हिमकाक पक्षी एव्हरेस्ट चढणाऱ्या गिर्यारोहकांच्या मागे मागे साडेआठ हजार मीटर म्हणजे सुमारे सत्तावीस हजार फुटांपर्यंत आल्याची नोंद आहे. एवढ्या उंचीवर या पक्ष्यांना बर्फ, थंडी आणि हवेची कमी होत जाणारी घनता याचा कोणत्याही प्रकारे त्रास होत असलेला दिसत नाही. हिवाळ्यात पक्षी दक्षिणेकडे स्थलांतर करतात ते थंडीमुळे नाही तर बर्फ पडून अन्न शोधणे कठीण झाल्यामुळे.

अनेक पक्षी असे आहेत, की जे बर्फ पडायला लागल्याच्या आधी, अन्न अद्यापही भरपूर उपलब्ध असतानाच आपल्या दक्षिण यात्रेला सुरूवात करतात. या पक्ष्यांच्या स्थलांतरासाठी अन्नाच्या तुटवड्याची वाट पाहात बसत नाहीत. सूर्य दक्षिणेकडे झुकू लागला, की त्यांचे मन जणू उचल खाते, दक्षिणेची ओढ लागते, आतील अस्वस्थता वाढते. एका जातीचे अनेक पक्षी एकत्र येतात आणि ठरावीक मुहूर्ताला प्रयाण करतात. या पक्ष्यांच्या बाबतीत स्थलांतराचा आता अन्नाशी संबंध उरला नसून ठरावीक ऋतूत ठरावीक दिशेने झेप घेणे हा एक धार्मिक विधी असल्यासारखा त्यांच्या जीवनाचाच एक भाग झाला आहे. परतीच्या प्रवासाचेही तसेच. वसंतागमनाला सगळेच पक्षी अनामिक ओढीने आपल्या उत्तरेतल्या घरांकडे निघतात.

खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :—

(अ) हिवाळ्यात युरोपमध्ये पक्ष्यांचे गायब होण्यामागचे रहस्य सुरूवातीच्या काळात कसे लक्षात आले ?

(ब) हिवाळ्यात पक्षी दक्षिणेकडे स्थलांतर का करतात ?

(क) पक्ष्यांच्या स्थलांतराचा मार्ग शोधण्यासाठी कोणता उपाय वापरला जात होता ?

(ड) फक्त ॲल्युमिनिअमचे वाळे पक्ष्यांच्या पायात का अडकवतात ?

(इ) युरोपमध्ये हिवाळ्यात दिसेनासे होणाऱ्या पक्ष्यांच्याविषयी अनेकांची काय समजूत होती ? १०

प्रश्न क्र. २ गट "अ" मधील वाक्प्रचारांची गट "ब" मधील अर्थाशी समान जुळणी करा :—

| **"अ"** गट | **"ब"** गट |
|---|---|
| (अ) नवल वाटणे | (१) उत्सुक होणे |
| (ब) हिसकावून घेणे | (२) माहित नसणे |
| (क) आतुर होणे | (३) एखाद्या गोष्टीचा सतत विचार करणे |
| (ड) अभिमानाने फुलून येणे | (४) उंच उडणे |
| (इ) अनुकरण करणे | (५) खूप कष्ट करणे |
| (फ) कल्पना नसणे | (६) खेचून घेणे |
| (ग) कसोशीने प्रयत्न करणे | (७) वचक असणे |
| (ह) दरारा असणे | (८) आश्चर्य वाटणे |
| (य) ध्यास घेणे | (९) खूप आनंद होणे |
| (र) झेप घेणे | (१०) नक्कल करणे. |

प्रश्न क्र. ३ पुढीलपैकी कोणत्याही **पाच** शब्दांचा वाक्यात उपयोग करा :— १०

(अ) प्रसंग (ब) मंदिर

(क) नदी (ड) मुंबई

(इ) जागतिक (फ) चंद्र.

प्रश्न क्र. ४ पुढीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे लिहा :— २०

(अ) झाडे सजीवांसाठी जीवनदायी केंद्र कसे बनू शकते, हे विधान तुमच्या भाषेत स्पष्ट करा.

(ब) काझीरंगा अभयारण्यातील वैजयंती या हत्तीणीची वैशिष्ट्ये लिहा.

(क) व्यायामाचे शरीराला होणारे फायदे तुमच्या शब्दात लिहा.

(ड) व्यंगचित्र व हास्यचित्र यांमधील फरक स्पष्ट करा.

(इ) बंडूनानांच्या छंदाच्या वर्णनातून 'कुलूप' या पाठामध्ये घडलेले विनोद लिहा.

(फ) 'ॲनी सुलिव्हॅन नसत्या तर हेलन घडली नसती' या विधानाची सत्यता 'शब्दांचा खेळ' या पाठाच्या आधारे स्पष्ट करा.

प्रश्न क्र. ५ कोणत्याही एका पाठाच्या/कवितेच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही **चार**) :— १०

(अ) 'दिव्याच्या शोधामागचे दिव्य' या पाठाच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

(१) सूर्यग्रहणाच्या दिवशी एडिसनच्या डोक्यामध्ये कोणता विचार आला?

(२) एडिसनचे वैशिष्ट्ये कोणते ?

(३) कामातून फुरसत मिळाली की एडिसन काय करायचे?

(४) एडिसनने टिकाकारांना कोणते उत्तर दिले?

(५) प्रयोग यशस्वी झाल्यानंतर एडिसनने कुठे रोषणाई केली?

**किंवा**

(ब) 'तिफन' या कवितेच्या आधारे पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :—

(१) 'तिफन' या कवितेची मध्यवर्ती कल्पना स्पष्ट करा.

(२) 'तिफन' या कवितेतून कोणता संदेश मिळतो?

(३) 'तिफन' या कवितेची भाषिक वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

(४) काटा पायात रुतते लाल रगत सांडते हिर्व सपन फुलते, काव्यपंक्तीतील संकल्पना स्पष्ट करा.

(५) काया मातीत मातीत तिफन चालते, ईज नाचते थयथय ढग ढोल वाजवते, या काव्यपंक्तीतील आशयसौंदर्य स्पष्ट करा.

प्रश्न क्र. ६ (अ) पुढीलपैकी कोणत्याही **पाच** इंग्रजी शब्दांचे मराठीतील पर्यायी शब्द लिहा :— ५

(१) Ambulance (२) Guide

(३) Branch (४) Dazzling

(५) Radical (६) Divine.

(ब) पुढीलपैकी कोणत्याही **पाच** संख्या अक्षरात लिहा :— ५

(१) ११४० =

(२) ६००+३० = ६३०

(३) ३५५-५५ = ३००

(४) ३६ × ५ = १८०

(५) ५१ ÷ १७ = ३

(६) २५.७ =

[उलटून पहा

(क) रिकाम्या जागी कंसातील शब्दांचे योग्य रूप घालून ती वाक्ये पुन्हा लिहा (कोणतेही **दहा**) :— १०

(१) आजच्या या पहिल्या ………… आपल्या विद्यालयाची इभ्रत अवलंबून आहे. (कार्यक्रम)

(२) म्हशी …………… चालतात, त्यावेळी गवतातले अनेक लहान कीटक घाबरून हवेत उडतात. (गवत)

(३) ऑलंपिक ……………… आमची मोटर भरधाव वेगाने जात होती. (गाव)

(४) एडिसनच्या ……………… फारसे गंभीरपणे मनावर घेतले नाही. (मित्र)

(५) विद्यार्थी जीवनात चांगल्या ……………… अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. (सवय)

(६) सखू आजी सहज बोलायला लागली तरी एक …………… बोलायची. (कविता)

(७) ……………… हास्यचित्र काढणं ही सर्वात अवघड गोष्ट आहे. (मुल)

(८) एखादा वाळे असलेला पक्षी जिवंत अथवा मृत ज्याला सापडेल त्याने त्या ……………… कळवावे अशी अपेक्षा असते. (संस्था)

(९) ………… कोणते कुलूप लावायचे याचा बंडूनानांना फार दिवस प्रश्न पडला होता. (तिजोरी)

(१०) व्हेनिस हे त्या ……………… अखेरचे स्टेशन होते. (गाडी)

(११) …………… खूण केली व गर्रकन वळसा घेऊन वैजयंती दुसरीकडे निघाली (माहूत).

प्रश्न क्र. ७ (अ) पुढीलपैकी कोणतेही **तीन** शब्द शुद्ध करून लिहा :— ३

(१) आफरिका (२) खिडकि

(३) कारकुन (४) मूबई.

(ब) पुढीलपैकी कोणत्याही **तीन** शब्दांचे वचन बदला :— ३

(१) वही (२) पान

(३) पीक (४) वेल.

(क) पुढीलपैकी कोणत्याही **तीन** शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा :— ३

(१) मान (२) जय

(३) डोळस (४) शुभ.

(ड) कंसातील सूचनेप्रमाणे **एक** वाक्य बदलून लिहा :— १

(१) राम देवळात गेला (काळ ओळखा)

(२) <u>अरेरे</u> ! तो नापास झाला. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा.)

---